पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 13/02/2020 (गुरूवार)
(सायंकाळ)

---

## ॲसीड हल्ला करून जिवाणेमारण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. सावनेर :– अंर्तगत 1 कि. मी. अंतरावर पहलेपार, सावनेर येथे दिनांक 13/02/2020 रोजी मेडिकल कॉलेज नागपूर तर्फे नॅशनल एड्स कंट्रोल ऑर्गनायझेशनसाठी सर्वे सुरू होता. यासाठी नागपुरातील तीन डॉक्टर सावनेरला गेले होते. त्यांच्यासोबत सावनेरातील दोन कर्मचारी होते. असे पाच जणांचे पथक सर्वेसाठी गावात फिरत असतांना दुपारी 12:10 वा. दरम्यान सावनेरच्या पहलेपार जवळच्या कडकडी महाराज मंदिरावर ते समुह असतांना, मनोरूग्ण आरोपी नामे– निलेश कन्हेरे, वय 22 वर्ष, रा. तेलंगखेडी(पो. स्टे. केळवद)ता. सावनेर हा तेथे आला व रूग्णालय मध्ये काम करणाऱ्या फिर्यादी महिला डॉक्टर व यांचे साथीदारावर ॲसिड हल्ला करून जिवाने मारण्याचा प्रयत्न केला. यात महिला डॉक्टर यांनी चेहरा बाजुला केल्याने या ऍसिडचे काही कण बाजुला असलेल्या एका विद्यर्थिनीवर व अन्य एका महिलेच्या चेहऱ्यावर पडले. यात या दोघींनाही किरकोळ जखमा झाल्या आहेत. दोघीही जखमींना तात्काळ नागपुरातील मेयो रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तसेच दोन्ही जखमींना उपचार करून सोडण्यात आले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 307, 326(ब) भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री. अशोक कोळी 9657811111 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर